# महाराष्ट्र विधानपरिषद
# नियम समितीचा पहिला अहवाल
# २०१८

(दिनांक          मार्च, २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधानभवन, मुंबई

मार्च, २०१८

# महाराष्ट्र विधानपरिषद नियम समितीचा
# पहिला अहवाल
# २०१८

# विधानपरिषद नियम समिती

## (२०१७-१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

**सदस्य**

(२) श्री. धनंजय मुंडे, माननीय विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद.

(३) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

(४) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(५) ॲड. अनिल परब, वि.प.स.

(६) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(७) श्री. शिवाजीराव देशमुख, वि.प.स.

(८) श्री. दिलीपराव देशमुख, वि.प.स.

(९) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. यु. के. चव्हाण, सेवानिवृत्त सचिव (एमपॅनलमेंट)

(३) श्री. विलास आठवले, उप सचिव

(४) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव

(५) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(६) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

## अहवाल

मी, समिती प्रमुख विधानपरिषद नियम समिती, समितीने आपल्या वतीने अहवाल सादर करण्यास मला प्राधिकृत केल्यावरून विधानपरिषदेला हा अहवाल सादर करीत आहे.

**२.** महिलांचे हक्क व कल्याण समिती या समितीचे नामाभिधान बदलून आता ते " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती ", असे करण्यात आले असून सदर समितीचे नामाभिधान व कार्यकक्षा सुधारण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र विधानसभेत संमत करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र विधानपरिषद नियमांमध्ये समितीच्या नामाभिधानात झालेल्या बदलानुसार सुधारणा करण्यासंदर्भात व्यापक विचारविनिमय होण्याच्या दृष्टीने समितीची बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. समितीचा प्रस्ताव " अनुसूची-एक " मध्ये दर्शविण्यात आलेला असून समितीकडे प्राप्त झालेल्या सदर सूचना/सुधारणा " अनुसूची-दोन " मध्ये देण्यात आल्या आहेत. समितीने मान्य केलेल्या सूचना/ सुधारणा " अनुसूची-तीन " मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

**३.** समितीने दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी संमत आणि स्वीकृत केलेला अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

**भाग चौदा " समित्या " यांमध्ये**

**मान्य केलेली सुधारणा क्रमांक (१) :** नियम २०५ यानंतर " **(फ)** " मध्ये " **महिलांचे हक्क व कल्याण** " या मजकूराऐवजी " **महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण** " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**मान्य केलेली सुधारणा क्रमांक (२) :** नियम २१४-अ च्या समास टीपेमध्ये व नियमातील ओळ क्रमांक ३ वरील " **महिलांचे हक्क व कल्याण समिती** " या मजकूराऐवजी " **महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती** " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**मान्य केलेली सुधारणा क्रमांक (३) :** नियम २१५ च्या ओळ क्रमांक ४ वरील " **महिलांचे हक्क व कल्याण समिती** " या मजकूराऐवजी "**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**हा अहवाल व त्याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषद नियमांत सुचविण्यात आलेल्या सुधारणा सभागृहाने स्वीकाराव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

**विधानभवन :**
नागपूर,
दिनांक २० डिसेंबर, २०१७.

**रामराजे नाईक-निंबाळकर,**
समिती प्रमुख,
विधानपरिषद नियम समिती.

## अनुसूची - एक

### महाराष्ट्र विधानपरिषदेने गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी संमत केलेला प्रस्ताव

महिलांचे हक्क व कल्याणाबाबत तपासणी करून राज्य शासनाला शिफारशी करण्यासंदर्भात विधानमंडळाची महिलांचे हक्क व कल्याण समिती घटित करण्यात आलेली आहे. तथापि, बालकांचे हक्क व त्यांच्या संरक्षणासंदर्भातील विषय महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या कार्यकक्षेत अंतर्भूत करण्यात आलेला नाही. राज्य शासनाकडे महिला व बालविकास विभाग कार्यरत आहे. या बाबी विचारात घेऊन बालकांचे हक्क व संरक्षणाबाबतचा विषय विधानमंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीमध्ये अंतर्भूत करून समितीचे सुधारित नामाभिधान व कार्यकक्षा सुधारण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहात मांडत आहे :—

महिलांचे हक्क व कल्याण समितीचे सुधारित नामाभिधान " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती " असे करण्यात यावे. तसेच समितीच्या सध्याच्या कार्यकक्षेत बालहितासंदर्भातील पुढील बाबींचा समावेश करण्यात यावा :—

(१) बालकांचे आरोग्य, शिक्षण संरक्षण व मुलभूत हक्क इत्यादींकरिता बाल न्याय अधिनियम, २०१५ तसेच बालकांचे लैंगिक शोषणापासून प्रतिबंध कायदा (POSCO Act), २०१२ व तद्नुषंगिक विहित नियमांनुसार राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या बाबी संबंधात राज्य शासनाने करावयाची उपाययोजना व अंमलबजावणी.

(२) बालकांच्या विकासासाठी शासकीय पातळीवर अंगिकृत केलेल्या बाल न्याय अधिनियम, २०१५ च्या अनुषंगाने बाल धोरणाची अंमलबजावणी.

(३) राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या बालकांच्या कल्याणार्थ योजनांची तपासणी करून शिफारशी करणे.

(४) सभागृहाने किंवा अध्यक्षांनी/सभापतींनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे. समितीच्या रचनेत कोणताही बदल होणार नाही.

महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या नामाभिधानात व कार्यकक्षेत झालेल्या बदलानुसार नियमात सुधारणा करण्याची बाब विधानपरिषदेच्या नियम समितीकडे सुपूर्द करण्यात यावी.

## अनुसूची-दोन

### विधानपरिषद नियम - प्राप्त झालेल्या सूचना/सुधारणा

| अ.क्र. (१) | नियम क्रमांक (२) | सुधारणा/सूचना (३) | सुधारणेचे/सूचनेचे कारण (४) | सूचक (५) |
|---|---|---|---|---|
| १. | नियम २०५ यानंतर "(फ)" मध्ये. | " महिलांचे हक्क व कल्याण " या मजकुराऐवजी "महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण" हा मजकूर दाखल करण्यात यावा. | महिलांचे हक्क व कल्याण समितीचे नामाभिधान सुधारण्याबाबचा प्रस्ताव गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सभागृहात संमत करण्यात आला आहे. | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. |
| २. | " नियम २१४-अ " च्या समास टिपेमध्ये व नियमातील ओळ क्रमांक ३ वरील. | " महिलांचे हक्क व कल्याण समिती " या मजकुराऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती " हा मजकूर दाखल करण्यात यावा. | | |
| ३. | " नियम २१५" च्या ओळ क्रमांक ४ वरील. | " महिलांचे हक्क व कल्याण समिती " या मजकुराऐवजी "महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती" हा मजकूर दाखल करण्यात यावा. | | |

## अनुसूची-तीन

### समितीने विचारात घेतलेल्या आणि मान्य केलेल्या सूचना/सुधारणा

**सुधारणा :**

**भाग चौदा " समित्या " यांमध्ये**

**मान्य केलेली सुधारणा क्रमांक (१) :** नियम २०५ यानंतर " **(फ)** " मध्ये " **महिलांचे हक्क व कल्याण** " या मजकुराऐवजी " **महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण** " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**मान्य केलेली सुधारणा क्रमांक (२) :** नियम २१४-अ च्या समास टीपेमध्ये व नियमातील ओळ क्रमांक ३ वरील " **महिलांचे हक्क व कल्याण समिती** " या मजकुराऐवजी " **महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती** " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**मान्य केलेली सुधारणा क्रमांक (३) :** नियम २१५ च्या ओळ क्रमांक ४ वरील " **महिलांचे हक्क व कल्याण समिती** " या मजकुराऐवजी " **महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती** " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ३१९४—२ (३५०—३-२०१८)

# परिशिष्ट - एक

(समितीच्या बैठका)

**बैठक**

विधानपरिषद नियम समितीची बैठक बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी सायंकाळी ५-३० वाजता विधानपरिषद कामकाज सल्लागार समिती कक्ष क्रमांक १६, तळ मजला, विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद

(२) श्री. धनंजय मुंडे, माननीय विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद

(३) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(४) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (एमपॅनलमेंट)

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव

विधानपरिषद नियम समितीच्या बैठकीमध्ये समितीकडे विचारार्थ असलेल्या सूचना/सुधारणांवर विचारविनिमय करण्यात आला व समितीने प्रारूप अहवाल विचारात घेऊन काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई